दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२०  दिनांक : २३/११/१९

प्रति,
मा. सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,
13/11/19

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**तक्रार क्र. 41 :-** तक्रारदार श्री. धिरज परब दि.28/12/2018 नुसार भाईंदर पूर्व, जेसलपार्क चौपाटी येथील पालिकेने बेकायदा विकसित केलेल्या गुलाब बाग परिसरातील कांदळवनाच्या फांद्याची तोड, पालिकेने बसवलेले बेंच, लाद्या, माती काढून येथील प्रवेश बंद करणे तसेच संबंधित यांच्यावर वन कायद्या नुसार गुन्हा दाखल करणे बाबत.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती** :-

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.122 हे चौपाटी साठी आरक्षित आहे. सदर आरक्षणातील जागा मौजे नवघर स.क्र.209 मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या ताब्यात होती. सदर जागा दि.01/03/2018 रोजी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशान्वये महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तदपूर्वी सदर जागा मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी पश्चिम रेल्वेस दि. 3/12/1999 रोजी भाडेतत्वावर दिली होती. पश्चिम रेल्वेने वसई खाडीवर रेल्वे पुलाचे काम करण्यासाठी सदर ठिकाणी GIRDER चे बांधकाम केलेले आहे. परंतु पश्चिम रेल्वेने सदर GIRDER चे बांधकाम काढलेले नाही. भाईंदर पुर्व जेसलपार्क चौपाटी येथील RCC Girder मधील मोकळ्या जागेत गुलाबांच्या रोपांची लागवड करून बागीचा बनविण्यात आलेला असून सदर ठिकाणी कांदळवणाची कत्तल करण्यात आलेली नाही. तसेच सन 2012-13 मध्ये जेसलपार्क चौपाटी येथे किनारपटटीलगत 600 चौ.मी. क्षेत्रावर कांदळनाची लागवड करण्यात आलेली असून सध्यस्थितीत सदरची झाडे 10 ते 15 फुट उंचीची असून चांगल्या स्थितीत आहेत. पश्चिम रेल्वेने उभारलेल्या GIRDER वर नागरिकांच्या मागणीवरुन लोंखडी बेंचेस बसविण्यात आलेले आहेत. सदर ठिकाणी महानगरपालिकेने कोणतेही नविन बांधकाम केलेले नाही त्यामुळे महानगरपालिकेने कोणतेही कांदळवनाचे नुकसान केलेले नाही. तसेच सदर ठिकाणी बांधकामाबाबत कोणतेही अतिक्रमण आढळून आलेले नाही. सदयस्थितीत कांदळवन भागाजवळील GIRDER वरील बेंचेस काढण्यात आलेले असुन कांदळवन भागाजवळील क्षेत्रात जाण्यास प्रवेश बंद करण्यात आलेला आहे. तसेच सदर ठिकाणी तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे सुरु असलेले अश्लील प्रकार व मदयपान यांना आळा घालण्यासाठी संबंधीत पोलीस विभागाला पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे तसेच सदर ठिकाणी असलेल्या कांदळनाच्या संवर्धनासाठी महानगरपालिकेमार्फत यापुर्वीच संरक्षित फलक लावण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाची सर्वेक्षण होऊन अद्यापपर्यंत कांदळवन क्षेत्र अधिसुचित करण्यात आलेले नाही.

त्यामुळे कांदळवन क्षेत्र व 50 मीटर बफर झोनची हद्द निश्चित करता येत नाही. याकरीता मनपा क्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे सर्वेक्षण होऊन कांदळवन क्षेत्राची हद्द कायम करणे आवश्यक आहे. जेणेकरून कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व 50 मी. बफर झोनच्या हद्दीचे अनुपालन करणे सोईचे जाईल.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका